# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 07/11/2023 (मंगळवार) सायंकाळ

---

## जनावरे चोरी

**पो.स्टे. कोंढाळी** :– अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील मौजा जाटलापुर येथे दिनांक ०५/११/२०२३ चे रात्री दरम्यान फिर्यादी नामे– विलास महादेवरावजी कंगाली, वय ३५ वर्ष, रा. जाटलापूर याचे घराचे समोर आबादी जागेत ६ बकऱ्या बांधलेल्या होत्या. दिनांक ०६/११/२०२३ रोजी सकाळी ०४.३० वा. दरम्यान फिर्यादीने झोपेतून उठून पाहिले असता फिर्यादीने आबादी जागेत बांधलेल्या ६ बकऱ्या, (३ बोकड व ३ बकऱ्या) पांढऱ्या रंगाच्या किंमती अंदाजे १८०००/– रू दिसून आल्या नाही तसेच फिर्यादीचे घराशेजारी राहणारे व परिचयाचे राजेंद्र देवरावजी ताजने, वय ३८ वर्ष यांचे घरासमोर बांधलेली १ बकरी लाल रंगाची किंमती अंदाजे ३०००/– रू तसेच फिर्यादीचे परिचयाचे असलेले मनिश नागोराव कालभूत, वय २६ वर्ष यांचे घरासमोरील रोडवर बांधलेली १ बोकड व १ बकरी लाल रंगाचे किंमती अंदाजे ६०००/– रू असा एकूण ४ बोकड व ५ बकऱ्या किंमती २७०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कोंढाळी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार ठोंबरे, मो. नं. ७४९८६५७९६३ हे करीत आहे.

## कापूस चोरी करणाऱ्या आरोपीस अटक

**पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील हेटी सुरला सावनेर येथे दिनांक ०६/११/२०२३ चे ०५.४५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– दुर्गालाल लक्ष्मण खंगारे, वय ४८ वर्ष रा. वार्ड नं. १६ झेन्डा चौक पहलेपार सावनेर हा आपल्या घरी हजर असता गावातील लोकांनी फिर्यादीस सांगीतले की **आरोपी नामे– प्रतीक लक्ष्मण मेश्राम, वय १९ वर्ष, रा. सोनोरी ता. कळमेश्वर** हा फिर्यादीचे शेतातील कापूस चोरतांना मिळुन आला यावरून फिर्यादीने शेतात जावुन पाहीले असता आरोपीला काही लोक पकडुन होते व त्याचे हातात एक प्लॅस्टीकची बॅग होती व त्या बॅग मध्ये चोरी केलेले अंदाजे ९० किलो कापूस किंमती ७०००/–रू मुद्देमाल आरोपीने चोरलेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार राजेश हावरे मो. नं. ९९२३३६५६२२ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर